भारतीय रिझर्व्ह बँक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

आरबीआय/2019-20/07

डीसीएम (सीसी) क्र.जी-5/03.44.01/2019-20 जुलै 1, 2019

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व बँका

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - जनतेला ग्राहक सेवा देण्यामधील कामगिरीवर आधारित बँक शाखांसाठी दंड योजना**

कृपया दंड योजनेवरील परिपत्रक डीसीएम(सीसी) क्र.जी-4/03.44.01/2018-19 दि. जुलै 3, 2018 चा संदर्भ घ्यावा.

(2) ह्या विषयावरील सुधारित व अद्यावत केलेली आवृत्ती माहितीसाठी व आवश्यक त्या कारवाईसाठी जोडपत्रात दिली आहे.

(3) हे महापरिपत्रक आमच्या www.rbi.org.in वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

आपला विश्वासु,

(मानस रंजन मोहंती)
मुख्य महाव्यवस्थापक

सोबत : वरीलप्रमाणे

**जोडपत्र**

**जनतेला ग्राहक सेवा देण्यामधील कामगिरीवर आधारित, धनकोषांसह बँक शाखांसाठीच्या दंड योजनांवरील महापरिपत्रक**

(1) स्वच्छ नोटा धोरणाच्या उद्दिष्टांना अनुसरुन, नोटा व नाणी बदलून देण्याबाबत, सर्व बँक शाखा अधिक चांगली ग्राहक सेवा देतील ह्याची खात्री करुन घेण्यासाठी धनकोषांसह बँक शाखांसाठीची दंड योजना तयार करण्यात आली आहे.

(2) **दंड**

नोटा व नाणी बदलून देणे/आरबीआयला केलेली प्रेषणे/धनकोषांच्या कार्यकृती इत्यादींमधील त्रुटींसाठी बँकांवर लागु करावयाचे दंड पुढीलप्रमाणे आहेत.

| **अनु क्र.** | **अनियमिततेचे स्वरुप** | **दंड** |
|---|---|---|
| i. | मळक्या नोटांची प्रेषणे व धनकोषातील शिल्लका ह्यामधील त्रुटी | **रु. '50' पर्यंत मूल्याच्या नोटांसाठी**<br><br>हानी व्यतिरिक्त प्रति नग रु.50.<br><br>**रु.100 व त्यापेक्षा अधिक मूल्याच्या नोटांसाठी**<br><br>हानी व्यतिरिक्त प्रति नग त्या नोटेच्या मूल्याएवढे.<br><br>मळक्या नोटांची प्रेषणे/धनकोषातील शिल्लक ह्यात तूट आढळून आल्यास, तुटीची रक्कम / हानी ताबडतोब वसुल केली जाईल.<br><br>आढळून आलेल्या नगांची संख्या कितीही असली तरी, मळक्या नोटांची प्रेषणे/धनकोषातील शिल्लक ह्यात तूट आढळून आल्यास, त्यासाठी ताबडतोब दंड लावला जाईल. |
| ii | मळक्या नोटांची प्रेषणे व धनकोषांमधील शिल्लकांमध्ये खोट्या/नकली नोटा आढळून येणे. | बँका व धनकोषांमधील शिल्लका ह्यातील मळक्या नोटांच्या प्रेषणात नकली नोटा आढळून आल्यास, डीसीएम(एफएनवीडी)क्र.जी-1/16.01.05/2019-20 दि. जुलै 1, 2019 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार आरबीआयकडून दंड लावण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| iii | मळक्या नोटांची प्रेषणे व धनकोषांमधील शिल्लकांमध्ये फाटलेल्या नोटा आढळून येणे. | कितीही मूल्य असले तरी प्रति नग रु.50.<br><br>मळक्या नोटांची प्रेषणे/धनकोषातील शिल्लक ह्यात फाटलेल्या नोटा आढळून आल्यास त्या बाबतच्या हानीची रक्कम ताबडतोब वसुल केली जाईल.<br><br>मळक्या नोटांची प्रेषणे/धनकोषातील शिल्लक ह्यात फाटलेल्या नोटा आढळून आल्यास त्यासाठी ताबडतोब दंड लावला जाईल - मग अशा आढळून आलेल्य नगांची संख्या कितीही असो. |
| iv | धनकोषांकडून कार्यकारी मार्गदर्शक तत्वांचे पालन केले गेले नसल्याचे आरबीआय अधिका-यांना आढळल्यास<br>(अ) सीसीटीव्ही चालत/कार्य करत नसणे<br><br>(ब) स्ट्राँग रुम मध्ये ठेवलेली शाखेची रोकड/कागदपत्रे<br><br>(क) नोटा वेगवेगळ्या (सॉर्ट) करण्यासाठी एनएसएमचा वापर न केला जाणे (काऊंटरवर मिळालेल्या उच्च मूल्याच्या नोटा किंवा धनकोष/आरबीआयकडे प्रेषण केलेल्या नोटा वेगवेगळ्या (सॉर्ट) करण्यासाठी एनएसएमचा वापर न करणे) | प्रत्येक अनियमिततेसाठी रु.5,000.<br><br>पुनरावृत्ती झाल्यास हा दंड रु.10,000 पर्यंत वाढविला जाईल.<br><br>दंड ताबडतोब जारी केला जाईल. |
| v | आरबीआय बरोबर केलेल्या कराराच्या कोणत्याही अटी/शर्तींचे (धनकोष उघडणे व ठेवण्यासाठी) उल्लंघन किंवा बदलून देण्याची सुविधा देण्यामधील सेवेत त्रुटी असल्याचे आरबीआय अधिका-यांना दिसून आल्यास - उदाहरणार्थ<br>(अ) पुरेसा साठा असतानाही जनतेला काऊंटरवर नाणी न दिली जाणे.<br><br>(ब) कोणत्याही बँक शाखेने मळक्या नोटा बदलून देण्यास नकार देणे/जनतेने सादर केलेल्या फाटक्या नोटांचा निर्णय घेण्यास कोणत्याही धनकोष शाखेने नकार देणे.<br><br>(क) धनकोषांमधील शिल्लकांची अचानक तपासणी, त्याच्याशी संबंधित नसलेल्या अधिका-यांनी दर दोन महिन्यांनी आणि नियंत्रक कार्यालयातील अधिका-यांनी सहा महिन्यातून एकदा केलेली नसणे.<br><br>(ड) इतर बँकांच्या जोडणी शाखांना सुविधा/सेवा नाकारणे. | कराराचे कोणतेही उल्लंघन किंवा सेवेतील त्रुटीसाठी रु.10,000.<br><br>त्या शाखेकडून कराराचे उल्लंघन/सेवेतील त्रुटीचे 5 पेक्षा अधिक प्रसंग झाल्यास रु.5 लाख असा दंड लावण्यात आल्याचे वृत्त सार्वजनिक केले जाईल.<br><br>दंड ताबडतोब लावला जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | (ई) जनतेने व जोडणी बँक शाखांनी सादर केलेल्या कमी मूल्याच्या नोटांचा (म्हणजे रु.50 व त्यापेक्षा कमी मूल्याच्या) स्वीकार न करणे.<br><br>(फ) धनकोष शाखांनी पुनः देण्यासाठी तयार केलेल्या पॅकेट्समध्ये फाटलेल्या/नकली नोटा आढळून येणे. | |

**(3) दंड आकारण्यावरील कार्यकारी मार्गदर्शक तत्वे –**

**(3.1) सक्षम प्राधिकरण**

**अनियमिततेचे स्वरुप निश्चित करण्यासाठीचे** सक्षम प्राधिकरण, कसुरी करणारा धनकोष/बँक शाखा ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली आहे, त्या प्रादेशिक कार्यालयाच्या इश्यु विभागाचा प्रभारी अधिकारी हाच असेल.

**(3.2) अपीलीय प्राधिकरण -**

(i) सक्षम प्राधिकरणाच्या निर्णयाविरुध्दची याचिका धनकोष/शाखेच्या नियंत्रक कार्यालयाकडून, संबंधित प्रादेशिक कार्यालयाच्या प्रादेशिक संचालकाकडे, **डेबिट केले गेल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत** केली जाऊ शकते व ते प्रादेशिक संचालक ती याचिका स्वीकारावयाची की फेटाळावयाची हे ठरवतील.

(ii) कर्मचारी नवीन/अप्रशिक्षित आहेत, कर्मचा-यांमध्ये जाणीवेचा अभाव, सुधारक कारवाई केली आहे/केली जाईल ह्यासारख्या कारणांनी दंड माफ/रद्द केला जाण्याबाबतच्या याचिका विचारात घेतल्या जाणार नाहीत.

----------------------------------